पाच पिढ्यांच्या विश्वासाची अखंड परंपरा
माणक ज्वेलर्स
फूलचंद माणकलाल अँण्ड कं.
१९०७, एम.जी.रोड.
चोपडा, जि. जळगाव
पिन-४२५१०७ ९३७०५८१५५३
सुविचार - स्वतःवर विश्वास ठेवा, तुमच्या स्वप्नांना साकार करण्याची शक्ती तुमच्यातच आहे.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७५,२३७.९९ | -१६०.७३ (०.२१%) |
| डॉलर | ₹ ९५.८९ | |

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४३ | २८ |
| दिल्ली | ४४ | २९ |
| मुंबई | ३५ | २८ |
| नागपूर | ४३ | २८ |
| पुणे | ४० | २३ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार, दि. १८ मे २०२६ | वर्ष २ रे | अंक १८६ किंमत : ५ रु. | पाने ४

सूर्योदय - सूर्यास्त
स.-५:४९ संध्या-६:५९

सोने - चांदी

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५५,०००/- | २,६०,०००/- |

Rate By : माणक ज्वेलर्स, चोपडा

# हतनूर, गिरणा धरणाचा गाळ काढणार

## जळगाव, नाशिकच्या शेती क्षेत्राला होईल मोठा लाभ!

प्रतिनिधी । जळगाव

**राज्यातील धरणांत साचलेला गाळ काढण्याच्या महत्त्वाकांक्षी सुधारीत धोरणाला राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यामुळे पिण्याचे पाणी, भूजल पुनर्भरण तसेच शेती क्षेत्राला मोठा लाभ होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे. मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात प्रायोगिक तत्त्वावर सहा मोठ्या प्रकल्पांची निवड करण्यात आली असून, यात उत्तर महाराष्ट्रातील तापीवरील हतनूर तसेच गिरणा धरणाचाही समावेश करण्यात आला आहे.**



राज्यात जलसंपदा विभागांतर्गत पूर्णतः आणि अंशतः सिंचन क्षमता निर्माण झालेले ८६ मोठे, २९८ मध्यम आणि ३३१३ लघु, असे एकूण ३६९७ प्रकल्प कार्यरत आहेत.

दरवर्षी पावसाळ्यात नद्या, नाले आणि ओढ्यांमधून वाहून येणाऱ्या पुरासोबत मोठ्या प्रमाणावर माती, रेती, दगड आणि गोटे धरणांमध्ये साचत जातात. यामुळे कालांतराने धरणांची जलसाठा क्षमता घटत असल्याने अनेक प्रकल्पांमध्ये समस्या गंभीर बनली आहे. सिंचन, वीज निर्मिती आणि पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवरही परिणाम होत आहे. भविष्यातील वाढती पाणी टंचाई, हवामान बदल आणि अनियमित पावसाच्या पार्श्वभूमीवर जलसाठा क्षमता वाढविणे काळाची गरज बनली आहे. याच पार्श्वभूमीवर शासनाने गाळ व गाळमिश्रित वाळू निष्कासनासाठी सुधारीत धोरण लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

गाळ उपसा प्रक्रिया वैज्ञानिक पद्धतीने राबविण्यात येणार असून पर्यावरणीय संतुलन राखण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. धरणांची साठवण क्षमता वाढल्याने सिंचनासाठी अधिक पाणी उपलब्ध होऊ शकेल. दुष्काळग्रस्त भागांनाही मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच भूजल पातळी सुधारण्यास आणि नदी पात्रांची वहन क्षमता वाढण्यासही मदत होणार आहे.

शासनाने गाळ उपसा प्रक्रिया अधिक सुलभ करण्यावर भर दिल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्था, शेतकरी गट, सहकारी संस्था तसेच खासगी यंत्रणांच्या माध्यमातून ही मोहीम राबविण्याची तरतूद करण्यात आली आहे.

धरणातून काढण्यात येणारा गाळ शेतीसाठी अत्यंत सुपीक मानला जात असल्याने शेतकऱ्यांनाही याचा मोठा फायदा होणार आहे. शेतकऱ्यांना मोफत मिळणाऱ्या या गाळामुळे जमिनींची सुपीकता वाढेल.

### लाखो घनमीटर अतिरिक्त जलसाठा

**धरणांत साचलेला गाळ काढण्याच्या महत्त्वाकांक्षी सुधारीत धोरणांतर्गत राज्यातील मोठे, मध्यम आणि लघु सिंचन प्रकल्पांतून टप्प्याटप्प्याने गाळ काढण्यात येणार आहे. मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात प्रायोगिक तत्त्वावर राज्यातील सहा मोठ्या प्रकल्पांची निवड करण्यात आली आहे. यात उत्तर महाराष्ट्रातील हतनूर धरण (जळगाव), गिरणा धरण (नाशिक) यांच्यासह उजनी प्रकल्प (सोलापूर), गोसीखुर्द प्रकल्प (भंडारा), जायकवाडी प्रकल्प (छत्रपती संभाजीनगर) आणि मुळा प्रकल्प (अहिल्यानगर) या धरणांचा समावेश आहे. या प्रकल्पांमधून मोठ्या प्रमाणावर गाळ आणि गाळमिश्रित वाळू काढण्यात येईल. त्यामुळे लाखो घनमीटर अतिरिक्त जलसाठा निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. धरणांमधील गाळ उपशामुळे मूळ साठवण क्षमता पुन्हा निर्माण होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे पावसाळ्यात धरणे भरल्यानंतर अधिक प्रमाणात पाणी साठवून ठेवणे शक्य होईल.**

**धरणांमधून काढण्यात येणाऱ्या गाळमिश्रित वाळूच्या विक्रीतून जलसंपदा विभागाला उत्पन्न मिळेल. त्यातून संबंधित प्रकल्पांच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च करण्यात येईल. तसेच शेतकऱ्यांना विनामूल्य सुपीक गाळाची माती उपलब्ध करून देण्यात येणार आहे.**

**- गिरीश महाजन**
(जलसंपदा मंत्री)

# जळगावात ‘विकास’चे दूध आजपासून प्रतिलिटर २ रुपयांनी महागले!




प्रतिनिधी । जळगाव


**इंधनाच्या सातत्याने वाढणाऱ्या किंमतींमुळे वाहतूक खर्चातील वाढ तसेच पशुखाद्य, वीज आणि प्रक्रिया खर्च वाढल्यामुळे जळगाव जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाने विकास दुधाच्या विक्री दरात प्रतिलिटर २ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन दर रविवारपासून लागू करण्यात आले आहेत. यानिर्णयामुळे शहर व परिसरातील हजारो ग्राहकांच्या दैनंदिन खर्चात वाढ होणार आहे. दूध दरवाढीमुळे घरगुती ग्राहकांसोबतच चहा विक्रेते, हॉटेल व्यावसायिक, मिठाई विक्रेते आणि दुग्धजन्य पदार्थ तयार करणाऱ्या व्यावसायिकांवरही परिणाम होणार आहे.**

**नवीन दरानुसार विकासचे गोल्ड दूध ७४ रुपयांवरून ७६ रुपये प्रतिलिटर करण्यात आले आहे. म्हशीच्या दुधाचा दर ६२ रुपयांवरून ६४ रुपये प्रतिलिटर झाला आहे. तर गायीचे दूध ५६ रुपयांवरून ५८ रुपये प्रतिलिटर दराने उपलब्ध होणार आहे.**

दूध संघाकडून जिल्ह्यातील विविध गावांमधून दररोज मोठ्याप्रमाणावर दूध संकलित केले जाते. हे दूध प्रक्रिया करून शहरातील विक्री केंद्रांमार्फत ग्राहकांपर्यंत पोहोचवले जाते. शहरात दररोज सुमारे ४५ हजार लिटर दुधाची विक्री होत असून त्यामध्ये गोल्ड दूध आणि म्हशीच्या दुधाला अधिक मागणी असते. सकाळी आणि सायंकाळी मोठ्याप्रमाणात दूध विक्री होत असल्याने वाहतूक व्यवस्था आणि शीतसाखळी व्यवस्थापनासाठी मोठा खर्च करावा लागत असल्याचे संघाच्या सूत्रांनी सांगितले. विशेष म्हणजे गेल्या वर्षभरात दूध दरात तिसऱ्यांदा वाढ करण्यात आली आहे. यापूर्वी गोल्ड दूध ७० रुपये प्रतिलिटर दराने उपलब्ध होते. त्यानंतर टप्प्याटप्प्याने दरवाढ करण्यात आली.

दूध संघाकडून दरवाढीबाबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीनुसार, गेल्या काही महिन्यांत डिझेल आणि पेट्रोलच्या किंमतीत सातत्याने वाढ झाल्याने ग्रामीण भागातून शहरात दूध पोहोचविण्याचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्याचबरोबर दूध संकलन केंद्रांवरील देखभाल खर्च, शीतगृह व्यवस्था, पॅकेजिंग साहित्य, प्लास्टिक (पान २ वर)

## थोडक्यात



### वकिलांच्या अनधिकृत दालनांवर बुलडोझर

**लखनौ ।** येथे अतिक्रमण हटाव मोहिमेचा मोठा धडाका सुरू झाला. जुन्या उच्च न्यायालय संकुलाजवळ जिल्हा दंडाधिकारी कार्यालयाच्या बाहेर असलेल्या सुमारे २४० वकिलांच्या दालनांवर (चेंबर्सवर) रविवारी प्रशासनाने बुलडोझर चालवला.या भागात सार्वजनिक जमिनीवर बेकायदेशीर ताबा मिळवल्याचा आरोप करणारी एक जनहित याचिका दाखल झाल्यानंतर, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ही अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेण्यात आली. ही पाडकाम मोहीम सुरू होताच वकिलांनी तीव्र निदर्शने केली; यामुळे घटनास्थळी मोठा पोलीस बंदोबस्त, बुलडोझर आणि महापालिका अधिकारी दिसून आले, तसेच संपूर्ण परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

### विराटने आयपीएलमध्ये रचला नवा इतिहास

**मुंबई ।** आयपीएल २०२६ च्या ६१ व्या सामन्यात पंजाब किंग्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आमनेसामने आले आहेत. या सामन्यात टॉस हारल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना आरसीबीचा स्टार फलंदाज विराट कोहली याने मैदानात उतरताच पुन्हा एकदा विक्रमांचा पाऊस पाडला आहे. पंजाबविरुद्धच्या डावात १६ वी धाव पूर्ण करताच विराटने चालू हंगामात ५०० धावांचा टप्पा ओलांडला. या सामन्यात ५८ धावांची शानदार खेळी करून तो बाद झाला, पण तत्पूर्वी त्याने सचिन तेंडुलकरसह फाफ डु प्लेसिसचा एक खास विक्रम मोडला.



### आमदार एस.कामराज यांची पक्षातून हकालपट्टी

**चेन्नई ।** तमिळनाडूतील एएमएमके या पक्षाने आपले एकमेव आमदार एस. कामराज यांची रविवारी पक्षातून हकालपट्टी केली. विधानसभेतील शक्तिपरीक्षेवेळी टीव्हीके सरकारला पाठिंबा दिल्याने ती कारवाई करण्यात आली.एएमएमकेचे प्रमुख टी.टी.व्ही.दिनाकरन यांनी पक्षविरोधी कारवायांबद्दल कामराजयांना बाहेरचा रस्ता दाखवण्यात आल्याची माहिती दिली. कामराज यांना आमदार म्हणून अपात्र ठरवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सूचित केले. त्यामुळे तमिळनाडूतील एनडीएचा घटक असणाऱ्या आणखी एका पक्षातील बेबनाव चव्हाट्यावर आला.

# अपात्र लाडक्या बहिणींना महिला विकास विभागात कागदपत्र सादर करण्याची संधी

वृत्तसंस्था । मुंबई

**भारतीय न्याय व्यवस्थेतङ्गलाखो आपराधी सुटले तरी चालतील पण एखाद्या निरपराध ला शिक्षा होता कामा नये असे म्हणतात. त्याच धर्तीवर सरकारने लाखो अपात्र बहिणींनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला असेल तरी चालेल पण एक पात्र लाडकी बहीण या योजनेपासून अलिप्त राहता कामा नये, यासाठी सरकारने मुदत संपल्यानंतरही काय निर्णय घेतला आहे ते पहा.**




मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ई केवायसी करण्याच्या मुदतीत योग्य ती कागदपत्र सादर करु न शकलेल्या लाडक्या बहीणींना जिल्हयाच्या महिला विकास विभागात ही कागदपत्र सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे. या योजनेतील मार्च व एप्रिल महिन्याचे अनुदान मागील आठवडयात बुधवार पासून देण्यास सुरुवात झाली आहे. एप्रिल अखेर राज्यात एक कोटी ७७ लाख लाडक्या बहीणी पात्र ठरलेल्या आहेत.मुख्यमंत्री लाडक्या बहीणींच्या अर्जांची गेली दीड वर्षे विविध प्रकारची पडताळणी होत आहे. अडीच कोटी अर्जातून एप्रिल अखेर एक कोटी ७७ लाख लाडक्या बहीणी पात्र ठरलेल्या आहेत. कोणतेही निकष न पाळणाऱ्या ६६ ते ७६ लाख लाडक्या बहीणी टप्याटप्याने अपात्र ठरलेल्या आहेत. या पडताळणीने राज्य सरकारचे या योजनेवर खर्च होणाऱ्या कोटयावधी रुपयांची बचत झाली (पान २ वर)

## स्विगी, झोमॅटो, ब्लिनकीटचे दर वाढणार?


वृत्तसंस्था । मुंबई

पेट्रोल-डिझेल दरवाढीच्या पार्श्वभूमीवर, गिग अँड प्लॅटफॉर्म सर्व्हिस वर्कर्स युनियनने ॲप-आधारित कामगारांसाठी प्रति-किलोमीटर सेवा दरात २० रुपयांची वाढ करण्याची मागणी केली आहे. भविष्यात आंदोलनाचा इशाराही दिला आहे. पेट्रोल, डिझेलच्या दरात शुक्रवारपासून प्रतिलिटर किमान तीन रुपयांची वाढ झाल्याने लाखो गिग कामगारांच्या आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. जवळपास चार वर्षांतील ही पहिली मोठी राष्ट्रीय इंधन दरवाढ असून, या निर्णयामुळे देशातील सुमारे एक कोटी २० लाख गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांच्या जीवनावर थेट प्रतिकूल परिणाम होईल.

# नाशिकमध्ये बंधाऱ्यात बुडून तीन मुलांसह महिलेचा मृत्यू

वृत्तसंस्था । नाशिक

**सिन्नर तालुक्यातील नांदूरशिंगोटे परिसरातील नागरे बंधाऱ्यात शनिवारी दुपारी एका महिलेसह तीन मुलांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.**



यवतमाळ जिल्ह्यातील काही कुटूंब मध विक्रीसाठी तीन दिवसांपूर्वी नांदुरशिंगोटे परिसरात आले होते. नाशिक-पुणे महामार्गालगतच्या मोकळ्या आवारात त्यांनी तात्पुरती राहण्याची व्यवस्था केली. येथून जवळच नागरे बंधारा आहे. त्यामुळे पाण्याचा प्रश्न मिटेल म्हणून त्यांनी तिथेच मुक्काम ठोकला. शनिवारी दुपारी साडेचार वाजता या कुटूंबातील महिला, तिचा मुलगा, दोन पुतणे बंधाऱ्याकडे गेले होते. त्यावेळी एक मुलगा पाण्यात पडल्याने त्याला वाचवण्यासाठी महिला व इतर दोन्ही मुले पाण्यात उतरली. मात्र, बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात गाळ साचलेला असल्याने त्यांना बाहेर पडता आले नाही.

गाळात अडकल्याने चौघांचाही पाण्यात बुडून मृत्यू झाला. सायंकाळी पाचच्या सुमारास महिलेचा पती कामावरून परतल्यावर पत्नी व मुले दिसली नाही. त्यामुळे त्याने परिसरात शोधाशोध सुरू केली. बंधाऱ्याजवळ कपडे व चप्पला आढळून आल्याने या भागात शोध मोहिम राबविण्यात आली. ग्रामस्थांच्या मदतीने बंधाऱ्यातून चौघांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच वावी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश शिंदे व सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

या घटनेत मनिषा विजय रामजोशी (३०) , मुलगा कार्तिक (नऊ) आदित्य शिंदे (सात) आणि अविनाश शिंदे (८) यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुणालयात पाठवले.

# ‘नार-पार-गिरणा’ प्रकल्पाचा ४ हजार ११६ कोटींचा कार्यारंभ आदेश जारी

## जळगाव, नाशिकसह उत्तर महाराष्ट्राचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार

वृत्तसंस्था । मालेगाव

**नाशिक आणि जळगाव जिल्ह्यासाठी ‘लाईफलाइन’ ठरणाऱ्या बहुचर्चित नार–पार–गिरणा नदी जोड प्रकल्पाचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील ४ हजार ११६.१० कोटी रुपयांच्या कामाचा कार्यारंभ आदेश नुकताच प्रदान करण्यात आला आहे. मेसर्स मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड आणि मेसर्स आयसीसी इन्फ्राटेक प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्यांना हे काम मिळाले आहे.**



उत्तर महाराष्ट्रातील गिरणा, मोसम, बोरी आणि कान्होळी नदी खोरे परिसर वर्षानुवर्षे दुष्काळी पट्ट्यात मोडतो. या भागाची तहान भागवण्यासाठी अरबी समुद्रात वाहून जाणारे पश्चिम वाहिनी नारपारऔरंगा नद्यांचे पाणी गिरणा उपखोऱ्यात वळवण्याचा पर्याय या क्षेत्रातील तज्ज्ञांनी सुचवला होता. त्यानुसार गेल्या अनेक वर्षांपासून नारपार प्रकल्पाची मागणी होत होती. त्यासाठी विविध पक्षीय लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. यापूर्वीच्या अनेक निवडणुकांमध्ये हा प्रचाराचा मुद्दा देखील झाला होता. या सर्व पार्श्वभूमीवर गेल्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मंत्री दादा भुसे यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले. ५ सप्टेंबर २०२४ रोजी ७,४६५.२९ कोटींच्या या प्रकल्पास (पान २ वर)

नार,पार गिरणा नदी जोड प्रकल्पाचे काम दोन टप्प्यात पूर्ण करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यातील ४,११६.१० कोटींच्या कामातून १०.६४ टीएमसी पाणी उपलब्ध होणार आहे. यामुळे नाशिक व जळगाव या दोन्ही जिल्ह्यांतील शेती व पिण्याचा पाणीप्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. तसेच उद्योगांसाठी पाणी उपलब्ध होण्याची आशा त्यामुळे निर्माण झाली आहे. नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा, कळवण, सटाणा, मालेगाव व देवळा परिसरातील सुमारे ८१,२३० एकर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. तसेच जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव,भडगाव व एरंडोल तालुक्यातील ४२,५६० एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे.

# डांगरजवळ चारचाकीच्या धडकेत गवंडी कामगाराचा मृत्यू

प्रतिनिधी । अमळनेर

**तालुक्यातील डांगर गावाजवळ दुचाकी आणि चारचाकी वाहनामध्ये झालेल्या भीषण अपघातात एका गवंडी कामगाराचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.**



चोपडाई कोंढावळ येथील शिवाजी भगवान सैंदाणे (वय ३८) असे मृत व्यक्तीचे नाव असून ते गवंडी काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते.

सैंदाणे हे डांगर येथून दुचाकीने चोपडाईकडे जात असताना समोरून येणाऱ्या किया सोनेट (क्र. एमएच १९ ईजी ०५८८) या चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

या अपघातात शिवाजी सैंदाणे गंभीर जखमी झाले. स्थानिकांच्या मदतीने त्यांना तातडीने धुळे येथील हिरे मेडिकल कॉलेजमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले.

दरम्यान, या प्रकरणी मयताच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरून किया सोनेट चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हेकॉ काशिनाथ पाटील करीत आहेत.

## संपादकीय

### रोजगार व्हिसाच्या अटी

सध्याचे मुक्त व्यापार करार केवळ गुंतवणूक व आयात–निर्यात शुल्कमाफीपर्यंत मर्यादित नसून, यात रोजगार व्हिसांच्या संदर्भातील काही अटीही समाविष्ट करण्यात येतात.दशकानुदशके, मुक्त व्यापार करार (एफटीए) प्रामुख्याने विविध वस्तूंवरील शुल्क (टॅरिफ) कमी करणे, आयात–निर्यात कोटा हटवणे, व्यवसायातील गुंतवणूक वाढवणे आणि वस्तूंच्या व्यापारातील सीमाशुल्क अडथळे दूर करण्यावरच केंद्रित होते.मात्र, सध्याच्या काळात केवळ वस्तूंच्या देवाण–घेवाणवर लक्ष केंद्रित न करता, या करारांमध्ये विद्यार्थी, कुशल कामगार, व्यावसायिक आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांच्या स्थलांतरासाठी आवश्यक व्हिसा प्रक्रियेवर अधिक भर दिला जातो.थोडक्यात, काळानुसार या करारांच्या स्वरूपात बदल होत गेलेत आणि यावर विविध अभ्यास अहवालदेखील उपलब्ध आहेत. जिनिव्हा विद्यापीठातील संशोधकांनी १९६० ते २०२० या कालावधीत स्वाक्षरी करण्यात आलेल्या प्राधान्य व्यापार करारांवर (प्रेफरेंशियल ट्रेड ॲग्रीमेंट) केलेल्या एका अभ्यासातून काही महत्त्वाचे निष्कर्ष समोर आले आहेत.प्राधान्य व्यापार करार हे जवळपास 'मुक्त व्यापार करारां'सारखेच असतात. या संशोधनाचा एक भाग म्हणून, १९६० ते २०२० या काळात जगभरात स्वाक्षरी करण्यात आलेल्या ७९७ हून अधिक व्यापार करारांचा अभ्यास करण्यात आला. संशोधकांना असे आढळून आले की, यापैकी ७० टक्क्यांहून अधिक करारांमध्ये व्हिसा किंवा स्थलांतराशी संबंधित काही तरतुदींचा समावेश आहे.पण जागतिक व्यापार संघटना (डब्ल्यूटीओ) या तरतुदींना मान्यता देते का? याचे उत्तर होय आहे. अशा प्रकारच्या मुद्द्यांचा समावेश जागतिक व्यापार संघटनेच्या सेवा व्यापारावरील सामान्य कराराच्या मोड ४ अंतर्गत करण्यात आला आहे. जगातील अनेक देश मोठ्या प्रमाणात आयात शुल्क किंवा टॅरिफ आकारत नाहीत आणि त्यांच्या बाजारपेठा तुलनेने छोट्या आहेत.अशी राष्ट्रे व्यापार करारांद्वारे दुसऱ्या देशांना विविध प्रकारचे व्हिसा कोटा देतात. व्हिसा कोट्यांच्या उपलब्धतेमुळे करार करणाऱ्या दोन्ही देशांतील लोकांचे येणे–जाणे सोपे होते. काही देशांना विविध क्षेत्रांमध्ये आवश्यक असलेल्या मानवी कौशल्याची तीव्र कमतरता भासते. त्यामुळे ते व्यापार करारांच्या माध्यमातून आरोग्य कर्मचारी, अभियंते, आरोग्यसेवा व्यावसायिक, शिक्षक आणि संशोधकांसाठी विशेष स्किल्ड व्हिसा देऊन मनुष्यबळातील तफावत भरून काढतात. दुसरीकडे, भारतासारख्या देशांना आपल्या नागरिकांसाठी काम आणि शिक्षणाच्या नवीन संधी हव्या असतात. भारतीय अभियंता व व्यावसायिक परदेशात जाऊन काम करून अनुभव घेतात. भारतात परत आल्यावर त्यांचा तो अनुभव देशाच्या कामी येतो. त्यामुळे अशा प्रकारच्या करारांमध्ये वाढ होत असणे आश्चर्यकारक नाही. पण भारत सरकार या संधींचा पुरेपूर फायदा घेत आहे का? भारताने ४० हून अधिक देशांशी मुक्त व्यापार करार (एफटीए) केले आहेत. यामध्ये अलीकडेच न्यूझीलंडसोबत करण्यात आलेल्या कराराचाही समावेश आहे. विशेष स्किल्ड व्हिसा किंवा मोबिलिटी प्रोव्हिजन्स हे भारताच्या व्यापार धोरणाचे एक संरचनात्मक घटक आहेत. याशिवाय भारत सहजासहजी करार करत नाही. पण का आणि कशासाठी? याचे उत्तर सोपे आहे. भारत वस्तू आणि सेवांची निर्यात, परकीय गुंतवणूक, औषधनिर्माण क्षेत्रातील निर्यात आणि परदेशातून येणाऱ्या पैशांमधून (रेमिटन्स) परकीय चलन मिळवतो. दरवर्षी निर्यातीतून मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये सेवा महसुलाचा मोठा वाटा असतो. एकूणच, गेली अनेक वर्षे देशाच्या जीडीपीपैकी सुमारे ५५ टक्के वाटा हा सेवा–संबंधित महसुलाचा आहे. यासारख्या मुद्द्यांचा उल्लेख २०२४ मध्ये प्रकाशित झालेल्या जागतिक बँकेच्या अहवालातही झाला होता. भारताचे आर्थिक गणित हे देशातील तज्ज्ञ, व्यावसायिक आणि कंपन्यांच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रकल्प व काम मिळवण्याच्या क्षमतेवर अवलंबून आहे.

# लाचखोरीला खतपाणी न घालता थेट तक्रार करा

## तळोदा येथे सीबीआयची व्यापारी संघाच्या बैठकीत आर. के. प्रसाद यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । तळोदा

**कोणत्याही शासकीय कामासाठी किंवा बँक कर्जासाठी कोणी अधिकारी अथवा कर्मचारी लाचेची मागणी करत असेल, तर त्याला खतपाणी न घालता थेट सीबीआयकडे तक्रार करा. तुमची एक छोटीशी जागृतता आणि संपर्क देशाला भ्रष्टाचारमुक्त करण्यासाठी मोठे पाऊल ठरेल, असे आवाहन केंद्रीय अन्वेषण विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक आर. के.प्रसाद यांनी येथे केले. बुधवारी तळोदा येथील व्यापारी महासंघाच्या पदाधिकारी व व्यापाऱ्यांसोबत आयोजित करण्यात आलेल्या एका विशेष बैठकीत ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.**



सर्वसामान्य नागरिक आणि व्यापाऱ्यांनी लाच देण्यास नकार दिला पाहिजे. कोणत्याही केंद्रीय किंवा शासकीय विभागातील अधिकारी, कर्मचारी पैशांची मागणी करत असेल तर घाबरू नका. तुमची ओळख गोपनीय ठेवून संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल.
–आर. के प्रसाद, अप्पर पोलीस अधीक्षक, सीबीआय

याप्रसंगी सीबीआयचे पोलीस उपअधीक्षक आर.के.जोशी हे देखील प्रामुख्याने उपस्थित होते. भ्रष्टाचाराविरुद्ध नागरिकांचे सहकार्य गरजेचे असल्याचे बैठकीत मार्गदर्शन करताना अप्पर पोलीस अधीक्षक आर.के.प्रसाद यांनी शासकीय कार्यालये आणि बँकांमध्ये होणाऱ्या भ्रष्टाचारावर कडक शब्दांत प्रहार केला. व्यापाऱ्यांच्या शंकांचे निरसन या बैठकीदरम्यान करण्यात आले. यावेळी उपस्थित व्यापाऱ्यांनी दैनंदिन व्यवसाय, बँक कर्ज प्रक्रिया आणि शासकीय कामांमध्ये येणाऱ्या अडचणी व भ्रष्टाचाराच्या स्वरूपाविषयी अधिकाऱ्यांकडे विविध प्रश्न उपस्थित केले. सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी कायदेशीर बाबी समजावून सांगत व्यापाऱ्यांच्या सर्व शंकांचे निरसन केले. तक्रार नोंदवण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या विविध माध्यमांची माहिती दिली.

या विशेष बैठकीला व्यापारी महासंघाचे अध्यक्ष आनंद सोनार, सचिव मनोज भामरे, सुभाष चोपडा, गौतम जैन व्यासपीठावर उपस्थित होते. याशिवाय बैठकीला शहरातील नामवंत व्यापारी दिलीप सोनार, अमित ठक्कर, मनोज सोनार, राजेंद्र जैन, राहुल सोनार, आश्विन सोनार, गणेश सोनार, योगेश सराफ, मुन्नू सोनार, दीपक सोनार, जगदीश चौधरी यांच्यासह व्यापारी महासंघाचे पदाधिकारी व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीमुळे तळोदा परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये आपल्या हक्कांबद्दल आणि कायद्याबद्दल मोठी जनजागृती निर्माण झाली आहे. सीबीआयच्या या पुढाकाराचे सर्वत्र कौतुक होत आहे. अनेकदा ग्रामीण भागातील नागरिकांना राष्ट्रीयकृत बँका, सार्वजनिक उपक्रम, शासकीय कार्यालय, केंद्र सरकारची योजना या संबंधित कार्यालयांमध्ये कामांसाठी अडवणूक केली जाते. अशावेळी नागरिक भीतीपोटी लाच देत असतात. मात्र आता घाबरायचे कारण नाही. अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, तक्रार करणाऱ्या व्यक्तीचे नाव गुपित ठेवण्यात येणार आहे. लाच देणे व घेणे हे कायद्याने गुन्हा असून नागरिकांनी लाच देऊच नवे.

# विश्व हिंदू परिषदेतर्फे निवेदन

प्रतिनिधी । धुळे

**पुनर्वसन काही नागरिक व हिंदुत्ववादी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी धुळे महापालिकेकडे निवेदन सादर करून ती प्रक्रिया तात्काळ स्थगित करण्याची मागणी केली आहे.**

देवपूर परिसरातील सर्वे क्रमांक ११४, ११५, २९, ३२ व ३३ मधील अतिक्रमणधारकांच्या प्रक्रियेविरोधात निवेदनात म्हटले आहे की, संबंधित जागा ही शासकीय भूखंड असून त्या परिसरातून पूर्वापार वाहणारा नैसर्गिक सुशी नाला जातो. पावसाळ्यात या नाल्यात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होत असल्याने त्या भागातील अतिक्रमण नियमित करणे धोकादायक ठरू शकते, असा दावा निवेदनकर्त्यांनी केला आहे. तसेच अतिक्रमणधारकांच्या पुनर्वसनासाठी राबविण्यात येत असलेल्या प्रक्रियेत कायदेशीर निकषांचे पालन झाले नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. अशा प्रकारे अतिक्रमणांना मान्यता दिल्यास भविष्यात शहरात अतिक्रमणांचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नियमित कर भरणाऱ्या नागरिकांवर अन्याय होऊ नये तसेच महापालिकेच्या निधीचा वापर कायदेशीर चौकटीत व्हावा, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली. या प्रक्रियेविरोधात आंदोलनाचा इशाराही देण्यात आला असून, निवेदनावेळी विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री निलेश रुणवाल, योगीराज मराठे, राजेंद्र खंडेलवाल, विकी परदेशी, नगरसेवक रोहित चांदोडे, पंकज धात्रक प्रथमेश गांधी, पंकज विंचू उपस्थित होते.



# शिवसेनेतर्फे एसपींचा सत्कार



प्रतिनिधी । धुळे

**जिल्हा पोलिस अधीक्षकपदी विशाल आनंद सिंगुरी यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्याचा शिवसेना महानगरतर्फे सत्कार करण्यात आला.**

यावेळी प्रथम महापौर भगवान करनकाळ, महानगर प्रमुख संजय वाल्हे, नगरसेवक बंटी खोपडे, नगरसेवक धिरज कलंत्री, महिला जिल्हाध्यक्ष हेमा हेमाडे, समाधान शेलार, तुषार नवले, रवी शिंदे, माधवराव विसपुते, निलू जोगी, शुभांगी जोगी, पिंजला जोगी, विष्णू जावडेकर, निलेश महाले, गोपाळ चौधरी, सचिन मोरे, भूषण ठाकरे, किरण आगलावे, शुभम शेलार, चेतन भारती, राहुल मराठे, आबा सैंदाणे, मयूर सोनार, शुभम जगदाळे, अजय जगदाळे, आनंद सोनवणे, सतिश काळे, मुकेश अहिरराव, सागर निकम, कुणाल सूर्यवंशी, चेतन कापडे, प्रवीण बाविस्कर आदींसह शिवसैनिक उपस्थित होते.

# फार्मसीच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीयस्तरावर कामगिरी

प्रतिनिधी । शिरपूर

**ई–युवा फेलोशिपमध्ये तरडी येथील एसव्हीकेएम कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी नॅशनल लेव्हलवर चमकदार कामगिरी करत संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाचा राष्ट्रीय स्तरावर गौरव वाढविला आहे.**



कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांच्या जैवतंत्रज्ञान उद्योग संशोधन सहाय्यता परिषद यांच्या सहयोगाने पंजाब केंद्रीय विद्यापीठामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित ई–युवा फेलोशिप महाविद्यालयातील संशोधन प्रकल्पाची निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या संशोधन प्रकल्पाचे शीर्षक डेव्हलपमेंट ऑफ नॉव्हेल जिंजर पायरिडॉक्सिन बक्कल फिल्म्स फॉर नॉशिया मॅनेजमेंट: मार्केट रेडी न्यूट्रास्युटिकल इनोव्हेशन असे आहे. मळमळ कमी करण्यासाठी आले व पायरिडॉक्सिन यांच्या साहाय्याने नवीन प्रकारचे बक्कल फिल्म विकसित करण्यावर आधारित हा संशोधन प्रकल्प असून न्यूट्रास्युटिकल क्षेत्रात तो उपयुक्त व प्रभावी ठरणार आहे.

या प्रकल्पासाठी रिवा परमार, मृणाली पवार, साहिल यादव, आवेश गिरासे व रेहान गिरासे या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या संपूर्ण संशोधन कार्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. कृष्ण स्वरूप अकेय यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या अध्यक्ष, माजी मंत्री, आ. अमरिशभाई पटेल, सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, राजगोपाल भंडारी, विनय भंडारी, प्राचार्य डॉ. विवेककुमार रेदासनी यांनी अभिनंदन केले.

# अमळनेर तालुक्यात चार ठिकाणी भीषण आग

प्रतिनिधी । अमळनेर

**वाढत्या उष्णतेमुळे शहर तसेच परिसरात रविवारी चार वेगवेगळ्या ठिकाणी आग लागल्याच्या घटना घडल्या. अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणल्याने मोठी हानी टळली.**





काल रविवारी दि. १७ रोजी १२.४५ वाजेच्या सुमारास मंगरूळ येथे गावालगतच्या खलवाडीत आग लागली. त्यानंतर दुपारी १.५५ वाजता मारवड रोडवरील शेत परिसरात, दुपारी २.०५ वाजता गलवाडे रोडवरील गंगा एक्का जवळील झाडांना तसेच दुपारी २.१५ वाजता नांदगाव रोडवरील शेतांना आग लागल्याच्या घटना घडल्या. नगरसेवक मुक्तार खाटीक, भुरा चौगुले व पंकज चौधरी यांनी दूरध्वनीद्वारे माहिती दिल्यानंतर अग्निशमन दलाने तातडीने चारही ठिकाणी धाव घेतली. अग्निशमन अधिकारी गणेश गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी दिनेश बिऱ्हाडे, फारुख शेख, जफर पठाण, मच्छिंद्र चौधरी, भिका संदानशिव, मुन्ना धनगर व आकाश बाविस्कर यांनी शर्थीचे प्रयत्न करत आग आटोक्यात आणली. तांबेपुरा, नांदगाव रोड परिसरात लागलेली आग विझवण्यासाठी नगरसेवक मुक्तार खाटीक, बाबा खाटीक तसेच शेतकरी नाना हिलाल पाटील, शेषराव रामराव पाटील आणि चेतन विजय पाटील यांनीही मदतकार्य करत आग विझवण्यासाठी प्रयत्न केले. स्थानिक नागरिक आणि अग्निशमन दलाच्या सतर्कतेमुळे मोठी हानी टळली आहे.

# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेच्या वेळापत्रकात बदल

प्रतिनिधी । धुळे

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत रविवार महाराष्ट्र शिक्षण पात्रता २०२६ परीक्षेचे २१ जून, २०२६ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्याऐवजी २८ जून, २०२६ रोजी घेण्यात येणार आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली आहे.**

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेचे रविवार २१ जून २०२६ रोजी आयोजन करण्यात आले होते. तथापि २१ जून, २०२६ रोजी या परीक्षेचे आयोजन संपूर्ण देशभरात विविध केंद्रावर करण्यात आलेले असून दोन्ही परीक्षांची बहुतांशी केंद्र एकच येत असल्याने महाराष्ट्र शिक्षक पात्रता २०२६ सुरळीतपणे पार पाडण्यासाठी व परीक्षार्थी हित लक्षात घेता महाराष्ट्र शिक्षक पात्रता – २०२६ परीक्षेचे आयोजन २१ जून, २०२६ त्याऐवजी रविवार २८ जून, २०२६ रोजी करण्यात आले आहे. परीक्षासाठी प्रवेशपत्र ऑनलाईन प्रिंट काढण्यासाठी १६ ते २८ जूनपर्यंत कालावधी आहे.

# जळगाव रेल्वे स्टेशनजवळ मालगाडीच्या बोगीला आग; मोठा अनर्थ टळला

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील रेलवे स्टेशन जवळ रविवारी सकाळी कोळसा वाहतूक करणाऱ्या मालगाडीच्या एका बोगीला अचानक आग लागल्याने परिसरात खळबळ उडाली. ही घटना उड्डाण पुलाजवळील नवीन तिकीट घराच्या परिसरात घडल्याने काही काळ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला.**

मिळालेल्या माहितीनुसार, भुसावळकडून जळगावकडे येणाऱ्या कोळशाने भरलेल्या मालवाहू रेल्वेच्या पाचव्या बोगीतून अचानक धूर निघत असल्याचे रेल्वे कर्मचाऱ्यांच्या लक्षात आले. यानंतर स्टेशन प्रबंधक एस. एस. ठाकूर यांनी सकाळी सुमारे ११ वाजून ४० मिनिटांनी शिवाजीनगर अग्निशमन केंद्राला तातडीने माहिती दिली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अग्निशमन दलाचे जवान तात्काळ बंबासह घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाचे वाहन चालक किरण महाजन, फायरमन शिवाजी तायडे आणि मनोज पाटील यांनी तातडीने आग विझवण्याची मोहीम हाती घेतली. त्यांच्या प्रयत्नांमुळे आग काही वेळातच पूर्णपणे नियंत्रणात आणण्यात यश आले. दरम्यान, ही घटना गजबजलेल्या नवीन तिकिट घर परिसरात घडल्याने आग पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. प्राथमिक माहितीनुसार, कडक उन्हामुळे निर्माण झालेली अंतर्गत उष्णता किंवा कोळशामधील घर्षणामुळे आग लागली असावी, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

## पान १ वरुन

### जळगावात 'विकास'चे दूध......

पान १ वरुन

पिशव्यांचे दर आणि वीज बिलांमध्येही वाढ झाली आहे. त्यामुळे उत्पादन खर्च आणि विक्री खर्च यामध्ये मोठी तफावत निर्माण झाली होती. म्हशीच्या दुधाच्या दरातही सातत्याने वाढ झाली असून ग्रामीण भागातील उत्पादन खर्च वाढल्याने शेतकरी देखील अधिक दराची मागणी करत होते. पशुखाद्याचे वाढलेले दर, चाऱ्याची कमतरता आणि जनावरांच्या देखभालीवरील खर्चामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांवर आर्थिक ताण निर्माण झाला होता. त्यामुळे दूध खरेदी दर वाढविण्याची मागणी दूध उत्पादकांकडून सातत्याने केली जात होती. विक्री दरातील वाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांच्या मासिक खर्चात वाढ होणार आहे.

चार सदस्यांच्या कुटुंबामध्ये दररोज एक ते दोन लिटर दूध सहजपणे वापरले जात असल्याने महिन्याला अतिरिक्त खर्च वाढणार आहे. चहा विक्रेते आणि हॉटेल व्यावसायिकांनीही या निर्णयामुळे चहा, कॉफी आणि दुग्धजन्य पदार्थांच्या दरात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

### 'नार–पार–गिरणा' प्रकल्पाचा......

राज्य शासनाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली. लवकरच कामाचे भूमिपूजन या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचा अभ्यास सध्या जलसंपदा विभागामार्फत सुरू आहे. या दुसऱ्या टप्प्यातून २०.६६ टीएमसी पाणी उपलब्ध होण्याची आशा आहे. हे दोन्ही टप्पे पूर्ण झाल्यानंतर उत्तर महाराष्ट्राच्या दुष्काळी भागाचे चित्र पालटण्यास मदत होणार आहे. दरम्यान, नारपार गिरणा नदीजोड प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील कामाचा कार्यारंभ आदेश जारी झाल्याने लवकरच या कामाचे भूमिपूजन होणार असल्याची माहिती शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिली आहे.

### अपात्र लाडक्या बहिणींना......

आहे. वर्षाला हा आकडा दहा हजार कोटीपेक्षा जास्त आहे.अर्ज पडताळणीसाठी अनेक संधी दिल्यानंतर सरकारने ३० एप्रिल ही शेवटची मुदत दिली होती. त्यानंतर राज्यातील लाडक्या बहीणींच्या संख्येचे खरे चित्र स्पष्ट झाले आहे. सरकारच्या दृष्टीने ही एक महत्वाची छाननी प्रक्रिया पार पडली आहे. तरीही या योजनेतील पात्र महिला योजनेपासून दूर राहू नये यासाठी आता ऑनलाईन ई केवायसी ऐवजी जिल्हा महिला विकास विभागात कागदपत्र सादर करण्याची मुभा सरकारने दिली आहे.

# आ.अग्रवाल यांचा पाठपुरावा; नवीन डीपी बसवण्याच्या कामाला वेग

प्रतिनिधी । धुळे

**शहरातील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याच्या समस्येवर अखेर कार्यवाहीला सुरुवात झाली असून प्रभाग क्रमांक ६ मधील विविध भागांमध्ये नवीन डीपी बसवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.**



प्रभाग क्रमांक ६ मधील नगरसेविका वैभवी अमित दुसाने यांनी परिसरातील नागरिकांच्या वतीने वीज विभागाचे शहर अभियंता जितेंद्र महाजन यांना निवेदन देऊन वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याबाबत तक्रार केली होती. तसेच धुळे शहराचे आ. अनुप अग्रवाल यांनाही यासंदर्भात निवेदन देण्यात आले होते. शहरातील इतर नगरसेवकांनी देखील वाढत्या वीजभारामुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाची माहिती देत डीपींची क्षमता वाढवण्याची मागणी केली होती. दरम्यान, आ. अनुप अग्रवाल यांनी नुकतीच वीज विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार आज प्रभाग क्रमांक ६ मधील पाटील नगर, सर्वेश्वर नगर, गणेश नगर आदी भागांसह चार ते पाच ठिकाणी नवीन डीपी बसवण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. यावेळी वीज विभागाचे शहर अभियंता जितेंद्र महाजन, नगरसेविका वैभवी अमित दुसाने, उपमहापौर ज्योत्स्ना प्रफुल्ल पाटील, नगरसेवक तथा माजी उपमहापौर भगवान गवळी, नगरसेवक जयेश वावदे यांच्यासह चंद्रशेखर तोरवणे, मधुकर सूर्यवंशी, एस. एम. पाटील, अजबराव खैरनार, प्रशांत साळुंखे, प्रणय साळुंखे, बापूसाहेब भोसले, अमित दुसाने, प्रफुल्ल पाटील आकाश बोरसे, शाम ब्राह्मणकर, श्याम बोरसे, प्रेमचंद अहिरराव, विनायक देवरे, वसंतराव भामरे, डॉ. अनिल गरुड, भागवत पाटील उपस्थित होते. तसेच यावेळी गोंदुर सबस्टेशन आणि भोकर सबस्टेशनचा नवीन वाढीव ट्रान्सफॉर्मरचा प्रस्ताव देण्यात आला. लवकरच यास मंजुरी मिळेल, असे उपमहापौर ज्योत्स्ना प्रफुल्ल पाटील, माजी उपमहापौर तथा नगरसेवक भगवान आप्पा गवळी, नगरसेविका वैभवी अमित दुसाने, नगरसेवक जयेश वावदे, या चारही नगरसेवकांच्या वतीने देण्यात आले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## दिन विशेष...

१६८२ : संभाजीराजे व महाराणी येसूबाई यांचे पुत्र छत्रपती शाहूमहाराज यांचा जन्म.
१९७२ : कोकण कृषी विद्यापीठाची स्थापना.
१९९१ : प्रसिध्द अक्षरतज्ज्ञ म.द.निजामपूरकर ऊर्फ कित्तेवाले निजामपूरकर यांचे निधन.
१९९७ : पहिल्या स्त्री चित्रपट कलाकार कमलाबाई गोखले यांचे निधन.

## थोडक्यात

### औषध विक्रेत्यांचा २० मे रोजी बंद

**अमळनेर ।** अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेच्या आवाहनानुसार २० मे २०२६ रोजी देशभरातील ठोक व किरकोळ औषध विक्रेते बंद पाळणार आहेत. त्यामुळे अनेक औषध दुकाने बंद राहण्याची शक्यता असून नागरिकांनी अत्यावश्यक औषधांची आगाऊ व्यवस्था करून ठेवावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाने केले आहे. आपत्कालीन सेवा व काही निवडक औषध दुकाने सुरू राहू शकतात. दरम्यान, औषधे ही अत्यावश्यक सेवा असल्याने बंदमध्ये सहभागी होऊ नये, असे आवाहन प्रशासनाने केमिस्ट बांधवांना केले आहे.

### फेसर्डी येथे मोतीबिंदू तपासणी शिबीर

**जळगाव ।** तालुक्यातील फेसर्डी येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेना व कांताई नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोतीबिंदू तपासणी शिबिर उत्साहात पार पडले. ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेवर नेत्रतपासणी व उपचार मिळावेत, या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे आयोजन महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे तालुका अध्यक्ष प्रदीप पाटील यांच्या सहकार्याने जिल्हा परिषद शाळा, फेसर्डी येथे करण्यात आले.

### ना. गिरीश महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य तपासणी

**रावेर ।** तालुक्यातील निंभोरा कृषितंत्र विद्यालयात रविवारी सकाळी ८.३० ते १२.३० वाजेपर्यंत साई मित्र परिवारातर्फे मोफत आरोग्य शिबीर मंत्री महोदय गिरीश महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली मोफत आरोग्य तपासणी, ईसीजी,रक्तदाब, तपासणी, बी.एस.एल. ब्लड शुगर तपासणी, तज्ञ डॉक्टराद्वारे मार्गदर्शन व तपासणी मेडिसीन, शस्त्रक्रिया विभाग, नाक, कान, व घसा विभाग, सर्व नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे मनोज सोनार व साई मित्र परिवारातर्फे कळविण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील १०५ अंगणवाड्यांना मिळणार हक्काचे छत

## डीपीडीसीकडून १५.५० कोटींचा निधी; ७१ अंगणवाड्या अजूनही भाड्याच्या इमारतीत

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील १०५ अंगणवाड्यांच्या इमारती उभारण्यास गती मिळाली आहे. जिल्हा नियोजन व विकास समितीच्या (डीपीडीसी) निधीतून या अंगणवाड्यांची उभारणी करण्यात येणार आहे. यासाठी तब्बल १५ कोटी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. यातील ७६ अंगणवाड्यांच्या बांधकामांचे कार्यादेश देण्यात आले असून कामांना प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे.**






जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी या कामांचा आढावा घेत ४८ अंगणवाड्यांची कामे मार्चअखेर पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. तर उर्वरित ५७ अंगणवाड्यांची कामे जानेवारीपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत. जिल्ह्यात सध्या ३ हजार ६०० हून अधिक अंगणवाड्या कार्यरत आहेत. त्यापैकी सुमारे ३ हजार ४०० अंगणवाड्यांना स्वतःची इमारत उपलब्ध आहे. मात्र अजूनही ७१ अंगणवाड्या शाळा, ग्रामपंचायतीच्या जागा किंवा भाड्याच्या खोल्यांमध्ये भरविल्या जात आहेत. त्यामुळे या अंगणवाड्यांना स्वतंत्र व सुरक्षित इमारती मिळाव्यात, यासाठी प्रशासनाने विशेष प्रयत्न सुरू केले आहेत.

एका अंगणवाडीच्या बांधकामासाठी साधारण ११ लाख २५ हजार रुपये खर्च येत असून आदिवासी भागातील अंगणवाड्यांसाठी १२ लाख ३० हजार रुपयांपर्यंत निधी मंजूर केला जात आहे. यापूर्वी प्रतिअंगणवाडी केवळ ८ लाख ५० हजार रुपये निधी मिळत होता. मात्र डीपीडीसीने वाढीव निधी दिल्याने आता अधिक दर्जेदार बांधकाम शक्य होणार आहे. २०२५-२६ च्या नियोजनातून डीपीडीसीने सुरुवातीला ९ कोटी ९९ लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता. त्यानंतर पुनर्नियोजनातून आणखी ५.५० कोटी रुपये उपलब्ध झाल्याने कामांना अधिक गती मिळणार आहे.

दरम्यान, उर्वरित ७१ अंगणवाड्यांसाठी सुमारे ८ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याचे महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी हेमंतकुमार भदाणे यांनी सांगितले. आगामी २०२६-२७ च्या नियोजनात यासाठी विशेष तरतूद करण्याबरोबरच काही जुन्या अंगणवाड्यांच्या दुरुस्तीची कामेदेखील हाती घेतली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# चाळीसगाव शहरात राष्ट्रीय डेंग्यू दिनानिमित्त जनजागृती अभियान

प्रतिनिधी । चाळीसगाव

**राष्ट्रीय डेंग्यू दिनानिमित्त चाळीसगाव शहरात शनिवारी विविध जनजागृतीपर उपक्रम उत्साहात राबविण्यात आले.**

साठवलेल्या पाणीसाठ्यांची तपासणी करा, स्वच्छता राखा ती भांडी झाकून ठेवा, या थीमअंतर्गत महात्मा फुले आरोग्य संकुल ग्रामीण रुग्णालय तसेच शहरातील बसस्थानक, मुख्य चौक आणि विविध सार्वजनिक ठिकाणी००००००००००००० नागरिकांमध्ये डेंग्यूबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. सचिन भायेकर,डॉ. प्रमोद सोनवणे, वैद्यकीय अधीक्षक वर्ग-१ डॉ. राजेंद्र चौधरी , डॉ. प्रशांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. वैद्यकीय अधिकारी श्रेणी-१ डॉ. वैदेही पंडित, डॉ. मंथन जाधव, डॉ. सागर बागडे, मानसी लोखंडे, आरबीएसके विभागातील वैद्यकीय अधिकारी तसेच किरण बेलदार यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आरोग्य सेवक दीपक ठाकरे, चंद्रकांत चौधरी तसेच नामदेव अहिरे यांनी शहरातील विविध भागांना भेट देत डेंग्यू, चिकुनगुनिया, हत्तीरोग आणि इतर कीटकजन्य आजारांबाबत नागरिकांना सविस्तर माहिती दिली. डासांच्या अळी नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना, घरगुती स्वच्छतेचे महत्त्व, पाणी साचू न देणे, तापाची लक्षणे दिसल्यास तत्काळ वैद्यकीय सल्ला घेणे यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

# उपक्रमशील उपशिक्षिका शैला बैसाणे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक सेवा पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी । अमळनेर

**तालुक्यातील अंतुर्ली-रंजाणे येथील नवीन माध्यमिक विद्यालयाच्या उपक्रमशील शिक्षिका शैला बैसाणे यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय व समर्पित कार्याचा गौरव करत त्यांना महाराष्ट्र शिक्षक पॅनलच्या वतीने राज्यस्तरीय ङ्गआदर्श शिक्षक सेवा सन्मान-२०२६फ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.**

सदर पुरस्कार वितरण सोहळा १२ मे रोजी शिर्डी येथे पार पडला. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून मराठी सिनेसृष्टीतील अभिनेत्री भार्गवी चिरमुले उपस्थित होत्या.

तसेच सुप्रसिद्ध मराठी कवयित्री गुंजन पाटील,मराठी कवी रोहित शिंगे यांचीही विशेष उपस्थिती होती. महाराष्ट्र शिक्षक पॅनलचे प्रमुख दीपक चामे यांच्या अध्यक्षतेखाली हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला.

शैला बैसाणे यांनी शिक्षण क्षेत्रात राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी घेतलेल्या परिश्रमांची तसेच सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

या सन्मानाबद्दल संस्थेचे चेअरमन, मुख्याध्यापक, शिक्षक सहकारी, पालक व परिसरातील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

हा पुरस्कार केवळ माझा नसून शाळेतील विद्यार्थी, सहकारी शिक्षक आणि संस्थेच्या सहकार्याचे प्रतीक आहे. या सन्मानामुळे पुढील काळात अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे, अश्या भावना शैला बैसाणे मॅडम यांनी मदै.शौर्य मराठीफशी बोलताना सांगितल्या.



## उपजिल्हा रुग्णालयाचे काम दोन महिन्यात पूर्ण करण्याचे आदेश

# ग्रामीण रुग्णालयातील उष्माघात कक्षाची आ.अनिल पाटील यांनी केली पाहणी





प्रतिनिधी । अमळनेर

**येथील ग्रामीण रुग्णालयात माजी मंत्री तथा आमदार अनिल पाटील यांनी आज अचानक भेट देऊन पाहणी केली. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम सुरू असल्याने बंद असलेले स्वच्छतागृह , तुटलेले दरवाजे, नवीन बांधकामाची संथगती पाहून त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.**

जिल्हा रुग्णालयासाठी वरील मजल्यावर सुरू असलेल्या बांधकामाची गती अत्यंत संथ असल्याचे निदर्शनास आल्याने याबाबत आमदार पाटील यांनी बांधकाम विभागाच्या अभियंत्यांना धारेवर धरले. सदर बांधकाम कोणत्याही परिस्थितीत पुढील दोन महिन्यात पूर्ण करण्याचे कडक आदेश त्यांनी दिले. बांधकाम सुरू असल्याने वर्षभरापासून बंद असलेले स्वच्छतागृह सुरू करण्यासह दुरुस्ती व दरवाजांची तुटफुट तातडीने दुरुस्त करण्याच्या सूचनाही दिल्या. रुग्णालयातील बेडशीट अस्वच्छ असल्याने याबाबतही आमदारांनी नाराजी व्यक्त केली. रुग्णांच्या आरोग्याशी खेळ खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. औषधालयासह प्रत्येक विभागात प्रत्यक्ष जाऊन पाहणी करत काही सूचना त्यांनी केल्या. रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला स्वच्छ व दर्जेदार सुविधा मिळाल्याच पाहिजेत, यासाठी सर्वांनी जबाबदारीने काम करावे, असे त्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना सांगितले. रुग्णालय प्रशासनाला तातडीने सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले.वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रकाश ताळे यांच्याकडून त्यांनी संपूर्ण आढावा घेतला.

### उष्माघात कक्षाबाबत सूचना

**अमळनेर तालुक्यात उष्णतेमुळे काही बळी जात असल्याने उष्माघात कक्षाची आमदारांनी पाहणी केली. यासाठी कुलर, थंड पाणी व पुरेसा औषधी साठा आणि आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी आमदारांसोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन राजपूत, जितेंद्र ठाकूर, विजय पाटील, जयेश पाटील उपस्थित होते. तर रुग्णालयाच्यावतीने वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रकाश ताळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. जी.एम.पाटील, डॉ. संदीप जोशी, डॉ.प्रशांत शिंदे, डॉ.सुमित पाटील, डॉ परेश पाटील, बांधकाम अभियंता भागवत माळी यासह कर्मचारी उपस्थित होते.**

# चिनावल येथे राष्ट्रीय डेंग्यू दिवस साजरा



प्रतिनिधी । रावेर

**तालुक्यातील चिनावल येथे दि. १६ मे रोजी प्रा.आ. केंद्रातर्फे राष्ट्रीय डेंग्यू दिवस साजरा करण्यात आला.**

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. प्रमोद सोनवणे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अमोल भंगाळे वैद्यकीय अधिकारी डॉ. चित्रलेखा पाटील, तालुका हिवताप पर्यवेक्षक विजय नेमाडे नाना यांच्या आदेशानुसार शनिवार दि. १६ मे रोजी चिनावल येथे राष्ट्रीय डेंगू दिवस साजरा करण्यात आला व जनजागृती करण्यात आली.

याप्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपल पाटील, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी जयंत पाटील, जिवन सोनवणे, पुरुषोत्तम तायडे, आरोग्य निरीक्षक सुभाष ठाकूर, आरोग्य सेवक, गटप्रवर्तक व गावातील सर्व आशा वर्कर, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदर्श संस्कारांनी युक्त असे जीवन घडले पाहिजे : नरेंद्र नारखेडे



प्रतिनिधी । यावल

मानवाला अत्यंत दुर्मिळ आणि मोलाचा असा मानवी जन्म लाभलेला आहे. केवळ वयाने किंवा शरीराने मोठे होणे महत्त्वाचे नसून, जीवनात आदर्श संस्कार माणसाला चारित्र्यवान बनवतात, धर्मसंस्कार अध्यात्माची दिशा देतात आणि शिक्षणसंस्कार जीवनात विवेक, शिस्त व समाजसेवेची प्रेरणा निर्माण करतात आणि सामाजिक मूल्ये माणसामध्ये मानवता, बंधुभाव, सहकार्य आणि समाजाप्रती जबाबदारीची भावना निर्माण करतात.

संस्कारयुक्त जीवनच माणसाला समाजात खरे मोठेपण मिळवून देते. असे प्रतिपादन पंढरपूर दिगंबर वारकरी मठाचे अध्यक्ष नरेंद्र नारखेडे यांनी केले. श्रीकृष्ण महानुभाव मंदिर, फैजपूरचे मठाधिपती महंत श्री राजधर बाबा पूजदेकर यांच्या वतीने दि. १५ मे ते २२ मे दरम्यान आयोजित धर्मसंस्कार शिबिरात ते मार्गदर्शन करत होते.

**बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित हे शिबिर फैजपूर येथील ज्येष्ठ नागरिक हॉलमध्ये सुरू आहे. यावेळी नरेंद्र नारखेडे म्हणाले की, विद्यार्थीदशेत मिळालेले संस्कार हे संपूर्ण जीवन घडवतात. धर्मग्रंथ, समाजग्रंथ आणि संत साहित्याचे नियमित वाचन करून त्यातून विचार आणि संस्कार आत्मसात करावेत. ज्या धर्मात, समाजात आणि देशात आपण जन्म घेतला आहे, त्या देशाची संस्कृती अत्यंत महान आणि आदर्श आहे. या संस्कृतीचे जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.**


कार्यक्रमात चिराग दिगंबर श्रीखंडे न्हावीकर या बालकाने मनोगत व्यक्त केले. यावेळी नगराध्यक्षा दामिनी सराफ, नगरसेवक पवन सराफ, नगरसेविका सुनिता नेहेते, जयश्री चौधरी, डीवायएसपी अनिल बडगुजर, नरेंद्र नारखेडे, मानेकर बाबा शास्त्री (सावदा), राजूदादा बिडकर, सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र जपूर, वाभावी चौधरी, अनंता नेहेते आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मठाधिपती महंत राजधर बाबा पूजदेकर यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रज्ञा चौधरी यांनी केले.

# ढालगाव येथे राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा

## डेंग्यूवर खास औषध नाही, आठवड्यातून एक कोरडा दिवस पाळा

प्रतिनिधी । जामनेर

**जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सचिन भायेकर, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. प्रमोद सोनवणे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.राजेश सोनवणे, तालुका हिवताप पर्वेक्षक अण्णा जाधव यांच्या सूचनेनुसार व वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण पाटील, डॉ. सागर पाटील, आरोग्य सहाय्यक विक्रम राजपूत व अमित तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली ढालगांव गावातील मुख्य चौकात उपस्थित ग्रामस्थ यांच्या सोबत राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा करण्यात आला.**



ढालगाव उपकेंद्र येथील आरोग्य कर्मचारी डॉ.विवेक जाधव, आरोग्य सेवक मनोज परदेशी यांनी डेंग्यू या आजाराबद्दल उपस्थित ग्रामस्थांना पुढील प्रमाणे मार्गदर्शन केले. डेंग्यूचा उपचार डेंग्यूसाठी खास औषध नाही, पण लक्षणांवर आधारित उपचार केले जातात. डेंग्यूची प्रतिबंधात्मक उपाय म्हणजे आपल्या सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवावे. आजूबाजूला साचलेले पाणी दूषित पाणी यांचा निचारा व्यवस्थित करणे. वापरण्याचे साचवलेले पाण्याचे ड्रम, हौद हप्त्यातून एकदा धुवून स्वच्छ कोरडे ठेवणे, कुलरचे पाणी नियमित बदलणे, झाडांच्या कुड्या, नारळाच्या करवटे, जुने टायरमधील साचलेले पाणी काढून फेकणे, जेणे करून डेंग्यू सारख्या डासांची पैदास त्यात होणार नाही. सध्या वातावरणात बदल असल्याने डेंग्यू व हिवतापाच्या मच्छरांचे वाढण्याचे प्रमाण नाकारू शकत नाही, म्हणून आपले आरोग्य आपल्या हाथी असे समजून आपण वरील गोष्टींचे पालन करून डेंग्यू व इतर साथीचे आजार आपण रोखू शकतो.

# कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची राज्यस्तरीय दखल

## शिर्डी येथे मान्यवरांच्या हस्ते प्रगतिशील शेतकरी मोहन शिंदे यांचा गौरव



प्रतिनिधी । धरणगाव

**तालुक्यातील पिंप्री खु. येथील प्रगतिशील शेतकरी मोहन खंडू शिंदे यांच्या कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची राज्यस्तरावर दखल घेत त्यांना शिर्डी येथे आयोजित भव्य पुरस्कार सोहळ्यात सन्मानित करण्यात आले. धर्मवीर संभाजी राजे प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित महाराष्ट्र गौरव पुरस्कार सोहळा २०२६ मध्ये त्यांना महाराष्ट्र राज्य कृषितज्ञ पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.**

मोहन शिंदे यांनी आधुनिक शेती पद्धती, फळबाग लागवड, पीक नियोजन, शेतीपूरक जोड व्यवसाय तसेच शेतीमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून कृषिक्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांनी केवळ स्वतःच्या शेतीत प्रयोगशीलता दाखवली नसून परिसरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून शेतीत नवसंजीवनी देण्याचे कार्य केले आहे. शेतकऱ्यांचे उत्पादन वाढावे, शेती अधिक शाश्वत व्हावी तसेच कमी खर्चात अधिक उत्पन्न मिळावे, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

शेती व्यवस्थापन, सेंद्रिय शेती, फळबाग संवर्धन, पशुपालन व अन्य शेतीपूरक व्यवसाय याबाबत त्यांनी अनेक शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या कार्याचा लाभ परिसरातील अनेक शेतकरी घेत आहेत. या पुरस्कार सोहळ्यात शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाघचौरे, धर्मवीर संभाजी राजे प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष रवींद्र गुंजाळ तसेच मॅग्नेशिया ग्रो इंडियाचे संस्थापक अध्यक्ष किरण सुपे यांच्या हस्ते मोहन शिंदे यांचा सन्मान करण्यात आला. कृषी क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल मिळालेल्या या राज्यस्तरीय सन्मानामुळे पिंप्री खुर्दसह संपूर्ण धरणगाव तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# चुंचाळे-कर्जाने रस्ता कामांचे आ.प्रा.चंद्रकांत सोनवणे यांच्या हस्ते भूमिपूजन



प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार अण्णासाहेब प्रा. चंद्रकांत बळीराम सोनवणे व माजी आ.लताताई चंद्रकांत सोनवणे यांच्या प्रयत्नातून आमदार निधीतून चुंचाळे ते कर्जाने ७.५ किमी रस्त्यासाठी १२.५७ कोटी रुपये (बारा कोटी ५७ लाख रुपये) मंजूर होऊन कामाचे भूमिपूजन करण्यात आले.**

चुंचाळे ते कर्जाने रस्ता होईल, असा स्वप्नात पण विचार केला नव्हता, असे सांगून गावातील लोकांनी प्राध्यापक चंद्रकांत बळीराम सोनवणे व माजी आमदार लताताई चंद्रकांत सोनवणे यांचे आभार मानले.

यावेळी देवा पाटील शिवसेना प्रसिद्धीप्रमुख, लोटन कुमावत, संजय बाबाजी, नंदू चौधरी, नाना छगन, लीलाधर गुरुजी, धना बापू, पंढरी बापू, मनोहर कोळी, दत्तू सुखा पाटील, माधव झावरू पाटील, खुशाल कुमावत, किरण कुमावत, लक्ष्मण पाटील, नरू भाऊ, बबलू पाटील, दिलीप पाटील, नितीन पाटील, राजू पाटील, संजू पाटील, किशोर पाटील, संजय कुमावत, आनंदा रामू, भाऊसाहेब मराठे, बाळू भाऊ, छोटू भाऊ यांच्यासह गावातील सर्व शिवसैनिक ज्येष्ठ ग्रामस्थ मंडळी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

## थोडक्यात

### उमाळा येथे छत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्याची प्रतिष्ठापना

**जळगाव ।** उमाळा येथे छ. शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याची प्रतिष्ठापना मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात करण्यात आली. पुतळा बसवण्यात आल्यानंतर संपूर्ण गावात अभिमानाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी ढोल-ताशांच्या गजरात या ऐतिहासिक क्षणाचे स्वागत केले. गावातील प्रमुख चौक परिसरात नागरिक मोठ्या संख्येने जमले होते. जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. पुतळा स्थापनेनंतर परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

### मोहराळा येथे राष्ट्रीय डेंग्यू दिवस साजरा

**यावल ।** तालुक्यातील मोहराळा येथे दरवर्षीप्रमाणे राष्ट्रीय डेंग्यू दिवस साजरा करण्यात आला. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सचिन भायेकर जिल्हा हिवताप अधिकारी डॉ प्रमोद सोनवणे तालुका आरोग्य अधिकारी डॉ राजू तडवी तालुका हिवताप पर्यवेक्षक विजय नेमाडे यांच्या मार्गदर्शनाखाली मोहराळा येथे राष्ट्रीय डेंग्यू दिवस साजरा करण्यात आला.

# भुसावळ रेल्वे विभागात पर्यावरण संरक्षण अभियानाचा शुभारंभ

प्रतिनिधी । भुसावळ

**जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागात १५ मे ते ५ जून या कालावधीत व्यापक स्तरावर विविध जनजागृती, स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणाशी संबंधित कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.**





या उपक्रमांचा उद्देश रेल्वे कर्मचारी, प्रवासी तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये पर्यावरण संरक्षण, स्वच्छता आणि हरित जीवनशैलीबाबत जनजागृती निर्माण करणे हा आहे. विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयात आयोजित कार्यक्रमात विभागीय रेल्वे व्यवस्थापकांच्या उपस्थितीत सर्व रेल्वे कर्मचाऱ्यांना पर्यावरण संरक्षण, स्वच्छता राखणे तसेच हरित व शाश्वत जीवनशैली स्वीकारण्याची शपथ देण्यात आली. यावेळी विभागातील वरिष्ठ शाखा अधिकारी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या अभियानांतर्गत कार्यशाळा, लोको शेड, कोचिंग डेपो, कार्यालये आणि रेल्वे स्थानकांवरही पर्यावरण शपथ कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# निमगव्हाणला उद्या प.पू.श्री.छोटे सरकारजी महाराज यांचे आगमन, आशीर्वचन व भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यासह तापी परिसरातील भाविकांसाठी अत्यंत आनंदाची व भक्तिमय पर्वणी ठरणारा कार्यक्रम येत्या १९ मे मंगळवारी सायंकाळी ४ वाजता तीर्थक्षेत्र श्री.धुनिवाले दादाजी दरबार, निमगव्हाण (ता. चोपडा) येथे आयोजित करण्यात आला आहे.**

यात परमपूज्य गुरूदेव स्वामी भक्तानंदजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने तथा नर्मदा सम्राट परमपूज्य श्री.श्री.१००८ श्री.छोटे सरकारजी महाराज यांच्या पावन उपस्थितीत आशीर्वचन व भजनसंध्या या भव्य धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन





करण्यात आले आहे. परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सदरील कार्यक्रमात खंडवा येथील श्री.दादाजी दरबार मंदिराच्या नवनिर्माणासाठी मोलाचे योगदान देणारे खंडवा नगरीचे लोकप्रिय खासदार ज्ञानेश्वर पाटील यांचा यावेळी विशेष कृतज्ञतापूर्वक सत्कार ट्रस्टच्या वतीने करण्यात येणार आहे. याप्रसंगी विविध धार्मिक, सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांसह साधू-संत, तसेच दादाजी परिवारातील सेवक

### भाविक भक्तांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा; ट्रस्टतर्फे आवाहन

उपस्थित राहणार आहे. त्यांच्या पावन उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष आध्यात्मिक व भक्तिमय वातावरण लाभणार आहे. कार्यक्रमात जळगाव येथील भजन गायिका उज्ज्वला वर्मा यांच्या मधुर व भक्तिमय भजनांनी वातावरण भक्तीरसात रंगून जाणार आहे. तसेच ओम साई भजनी मंडळ, अमळनेर यांच्यावतीनेही भावपूर्ण भजन सेवा सादर करण्यात येणार आहे. या भजन संध्येमुळे उपस्थित भाविकांना आध्यात्मिक समाधान व भक्तीमय अनुभूती लाभणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. सदर कार्यक्रमाचे आयोजन विश्वस्त मंडळ श्री.धुनिवाले दादाजी प्रतिष्ठान, निमगव्हाण तसेच तापी परिसरातील समस्त ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. कार्यक्रमानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजनही करण्यात आले आहे. आयोजकांच्या वतीने सर्व भाविक, नागरिक व दादाजी भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष युवराजसिंग चौधरी, उपाध्यक्ष देवानंद पाटील, सचिव संदीप सुभाष पाटील, खजिनदार राजेंद्र चौधरी, सहसचिव गजानन पाटील यांच्यासह विश्वस्त मंडळ यांनी केले आहे.

# जैन सोशल ग्रुपच्या अध्यक्षपदी सचिन पारख तर सचिवपदी महावीर सिंघवी



प्रतिनिधी । अमळनेर

येथील जैन सोशल ग्रुप, अमळनेरच्या २०२६-२०२७ या वर्षाच्या १३ व्या पदग्रहण सोहळ्याचे आयोजन नुकतेच १० मे रोजी पी.बी.ए. इंग्लिश मीडियम स्कूलच्या रोटरी हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत अध्यक्षपदी सचिन पारख तर सचिवपदी महावीर सिंघवी यांच्यासह नव्या कार्यकारिणीने पदभार स्वीकारला. या कार्यक्रमाची सुरुवात पूजा पारख आणि रिना पारख यांनी सादर केलेल्या णमोकार महामंत्राने झाली. त्यानंतर आरोही भूपेंद्र जैन हिने गणेश वंदना सादर केली. मावळते अध्यक्ष सौरभ छाजेड आणि सचिव प्रितेश जैन यांनी आपल्या कार्यकाळाचा आढावा घेत नवनिर्वाचित अध्यक्ष सचिन एस. पारख, सचिव महावीर सिंघवी आणि त्यांच्या संचालक मंडळाकडे कार्यभार सुपूर्त केला. शपथविधी समारंभाचे संचालन इंस्टॉलिंग ऑफिसर सचिन ऐन शाह यांनी केले.

# गणपूर पीक संस्थेच्या चेअरमनपदी अमृत पाटील यांची निवड



प्रतिनिधी । चोपडा


**तालुक्यातील गणपूर येथील पीक संरक्षण सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी अमृत छगन पाटील यांची तर व्हा.चेअरमनपदी उज्वलसिंग मोहनसिंग राजपूत यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली.**

यावेळी झालेल्या बैठकीला सर्व सदस्य उपस्थित होते. बैठकीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सदस्य व गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# महावितरणच्या विरोधात आदर्श नगरातील नागरिक एकवटले

प्रतिनिधी । चोपडा

**सध्या सर्वत्र उन्हाने नागरीक त्रस्त झाले आहे. यात जळगाव जिल्ह्याचे तापमान ४४ अंश ते ४५अंश सेल्सिअसपर्यंत जात आहे. यात नागरिक उकाड्याने हैराण झाले असून चोपडा शहरातील आदर्श नगरातील वीज वारंवार खंडीत होत आहे. आणि वीजपुरवठा हा कमी जास्त होत असल्याने अनेक घरातील इलेक्ट्रॉनिक उपकरणे जळून खाक झाल्याच्या घटना ही घडल्या आहेत. घरमालकांची परवानगी न घेता स्मार्ट मीटर बसवले आहेत.**



**आणि अव्वाच्या सव्वा वीजबिल आकारणी केली जात असल्याने नागरिकांचा संताप अनावर होतांना दिसत आहे.**

> ● **शहरासह आदर्श नगर परिसरात वारंवार विजेचा लपंडाव, कमी व्होल्टेजमुळे होत आहे. यामुळे नागरिक कमालीचे त्रस्त झाले आहेत. वीज मंडळाने भर उन्हाळ्यात नागरिक उकाड्याने हैराण झाले आहेत. सौर उर्जेने जिल्हाभरात वीज बचत होऊनही नागरिकांचे हाल करीत असल्याने नागरिक आता एकवटले आहेत.**

चोपडा शहरातील आदर्श नगरातील रहिवाशांनी महावितरणचे कार्यालय गाठून निवेदन दिले. उपअभियंता बोरसे आणि ज्युनियर इंजिनिअर केदारे यांच्यासोबत भ्रमणध्वनीवर संपर्क केला असता लवकरच नवीन डी.पी लावून देऊ, असे आश्वासन त्यांनी दिले. निवेदन देतेवेळी लाईनमन खलसे आणि सचिन मोरे वायरमन हजर होते. त्यावेळी धनराज बडगे, दत्तात्रय सोनवणे, एस. पी.गुरव, सतीश सोनार, अनिल पाटील, अमोल पवार, धनंजय मोतीराळे, अमोल धनगर, गुलाब कोळी आणि पत्रकार मिलिंद सोनवणे उपस्थित होते.

# डेंग्यू दिनानिमित्त चोपडा नागरी आरोग्य केंद्रात जनजागृती सभा

## हस्तपत्रिका वाटून डेंग्यू आजाराबाबत उपस्थित नागरिकांना माहिती देऊन केली जनजागृती

प्रतिनिधी । चोपडा

**जिल्हा आरोग्य अधिकारी-डॉ सचिन भायेकर, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.प्रमोद यशवंतराव सोनवणे यांचे सूचनेनुसारतालुका आरोग्य अधिकारी डॉ.गिरीश गोसावी तथा नागरी आरोग्य केंद्राचें वैद्यकीय अधिकारी डॉ.चंद्रकांत बारेला, डॉ.सिद्धार्थ साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली दि . १६ शनिवार रोजी जागतिक डेंग्यु दिनाच्या अवचित्य साधून, चोपडा नागरी आरोग्य केंद्रात डासांमुळे होणारा डेंग्यू, चिकूनगुणिया आणि हिवताप या किटकजन्य आजारांविषयी उपस्थित नागरिकांना तथा रुग्णांना प्रतिबंधात्मक उपाय योजना व आरोग्य विषयक माहिती सांगून हस्तपत्रिका देऊन, डेंग्यू या आजाराबाबत जनजागृती करण्यात आली.**



आजच्या १६ मे हा डेंग्यु दिवस साजरा करण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे, वरील डेंग्यु आजारांबाबत नागरिकांना माहिती देऊन त्या आजारापासून उपाय योजना व काळजी घेण्याची सवय लावणे हा आहे. तालुका हिवताप पर्यवेक्षक जगदीश बाविस्कर यांनी तालुका आरोग्य सहाय्यक विजय देशमुखयांनी उपस्थित सर्व नागरिक तथा रुग्णांना डेंग्यू आजाराविषयी सविस्तर माहिती द्वारा समुपदेशन केले,डेंग्यू: हा आजार एडीस या डासांमुळे होतो. सकाळी व संध्याकाळी चावणाऱ्या या डासांपासून बचावासाठी घराभोवती पाणी साचू देऊ नये, वापरायची पाण्याची भांडी झाकलेली ठेवावीत, रात्री संध्याकाळी दारखिडक्या लवकर बंद करून घ्यावेत जेणे करून डास घरात प्रवेश करणार नाहीत, मच्छरदाणी वापरावी, गुडनाईट लिक्विड, मच्छर अगरबत्ती वापरावी, दार खिडक्यांना जाळी बसविण्यात यावी,परिसरात पाणी साचलेलं असल्यास डबक्यात डास अळी खाणारे गप्पी मासे सोडावे, गटारीत पाणी तुंबल्यास वंगण ऑइल टाकावे आदी उपाय योजना राबविण्यात याव्यात. ग्रामस्थांना दर आठवड्याला घराभोवती पाणी साचलेले ठिकाण तपासण्याचे व स्वच्छतेकडे लक्ष देण्याचे आवाहन करण्यात आले. शेवटी सर्व उपस्थितांनी व नागरिकांनी माझे गाव आरोग्य संपन्न गाव ही शपथ घेतली आणि आपल्या कुटुंबीयांनाही डेंग्यू व मलेरिया प्रतिबंधाचे संदेश पोहोचवण्याचे आश्वासन दिले. तसेच आरोग्य पथकाकडून देखील जागृतीपर रॅली काढण्यात आली, नागरिकांना आवाहन करण्यात आले की अजाराबाबत जागृत राहून आपल्याकडे कोणत्याही आरोग्यविषयक सर्वेक्षणासाठी घरी येणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे व कंटेनर तपासणी करून घेण्यात यावी, व आठवड्यातुन एक दिवस कोरडा दिवस पाळावा हे आवर्जून सांगितले. याप्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ.चंद्रकांत बारेला, डॉ.सिद्धर्थ साळूखे, औषध निर्माण अधिकारी अजय जैस्वाल, नदीम शेख फरीद, आरोग्य सेवक रामलू मडावी, अशोक वारे, आरोग्य सेविका बिनासिस्टर, तथा सर्व आरोग्य सेवक, सर्व आरोग्य सेविका, गटप्रवर्तक व सर्व आशा स्वयंसेविका आणि मोठ्याप्रमाणात शहरातील नागरिक उपस्थित होते.